CB

# TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH, PUNE

## BACHELOR OF COMPUTER APPLICATIONS (B.C.A.)(044)/
## BACHELOR OF SCIENCE(COMPUTER APPLICATIONS-750)/
## BCA (CYBER SECURITY - 464 /
## B.SC (CYBER SECURITY-760)
## EXAMINATION : MAY/JUNE - 2026
## SEMESTER – III

**Sub: Marathi (BCA23 –305/BCAC-23-305/BSC24-305/BSCC24-305)**

**दिनांक: ०८/०६/२०२६** **गुण : ३०** **वेळ : दु. २.०० ते दु. ३.३०**

**सूचना :**
१) सर्व प्रश्न सोडवा.
२) उजवीकडील अंक त्या प्रश्नांचे गुण दर्शवितात.
३) उत्तरपत्रिकेत प्रश्नपत्रिकेतील प्रश्नक्रमांक लिहिणे आवश्यक आहे.

**प्रश्न १ खालील प्रश्नांची योग्य पर्याय निवडून उत्तरे द्या.** **(०५)**

१. अर्धस्वरांना --------- या नावानेही ओळखले जाते
अ) उष्म वर्ण ब) स्पर्श वर्ण
क) अन्तस्थ वर्ण ड) विवृत्त वर्ण

२. पत्रव्यवहारात पत्त्याच्या सुरवातीला किंवा शेवटी कोणते विरामचिन्ह वापरले जाते ?
अ) अर्धविराम ब) स्वल्प विराम
क) पूर्णविराम ड) अपसरण

३. पुढीलपैकी कोणत्या प्रकारच्या निबंध प्रकारात दोन्ही बाजूंनी विचार करुन आपले मत मांडले जाते ?
अ) चरित्रात्मक ब) वैचारिक
क) आत्मनिवेदनपर ड) कल्पनाविलासात्मक

४. सारलेखकाने अर्थाची ---------- करणारे मुद्दे गाळावेत
अ) मांडणी ब) छाननी
क) चिकित्सा ड) पुनरूक्ती

५. सर्व स्वर ही .......आहेत
अ) विवृत्त वर्ण ब) स्पर्श वर्ण
क) अन्तस्थ वर्ण ड) उष्म वर्ण

**प्रश्न २ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **(१५)**

१. मागणीपत्राचा कोणताही एक नमुना लिहा.

२. मराठी भाषेतील विरामचिन्हांचे महत्त्व सांगा.

३. आत्मनिवेदनपर आणि कल्पनाविलासात्मक निबंध प्रकारातील फरक स्पष्ट करा.

४. सारलेखन म्हणजे काय?

५. व्याकरणाचे महत्त्व सांगा

**प्रश्न ३ कोणताही एक प्रश्न सोडवा** **(१०)**

१. **खालील विषयावर ६०० शब्दांत निबंध लिहा.**

**वाचनाचे महत्त्व**

**किंवा**

२. **दिलेल्या उताऱ्याचे १/३ सारांशलेखन करा, उताऱ्यास योग्य शिर्षक द्या.**

काही माणसं वादळं झेलतात आणि पचवतात, पुढं विशाल सागराचं रूप धारण करतात, काही माणसं वादळामुळे कोलमडून पडतात, तर काही माणसं वादळ पचवण्याचे धडे दुसऱ्यांकडून घेतात. आयुष्यभर आदिवासींसाठी डहाणूजवळील कोसबाडच्या टेकडीवर ज्ञानयज्ञ तेवत ठेवणाऱ्या थोर समाजसेविका आणि शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ यांचा समावेश यांपैकी पहिल्या श्रेणीत करावा लागेल. त्यांच्या निधनानं कोसबाडची टेकडी हळहळली आणि परिसरातील सर्व आदिवासींना हुंदके फुटले. अनुताईंच्या निधनानं एका व्रतस्थ जीवनाची अखेर झाली. थोर शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक यांच्या सहवासात वाढलेल्या अनुताईंचं एकूण जीवनच त्याग, कष्ट आणि निःस्वार्थी सेवा यांचा सुरेख मिलाफ होता. वयाच्या केवळ तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. विवाह असतो तरी काय हे समजण्यापूर्वीच, म्हणजे केवळ सहा महिन्यांतच त्यांच्या इवल्याशा कपाळावरील कुंकू नियतीनं कायमचंच पुसून टाकलं. भातुकलीचा खेळ मोडला; पण छोट्या अनूनं आभाळाएवढं दुःख पचवलं. कोलमडून टाकणारं वादळ पचवलं. ताराबाईंनी त्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसले. दुःखाचा डोंगर टाचेखाली चिरडत अनुताई मोठ्या जिद्दीनं उभ्या राहिल्या, त्या कधीही पराभूत न होण्यासाठी. त्यांनी स्वतः शिक्षण घेणं सुरू केलं. बाहेरून अभ्यास करून त्यांनी पदवी मिळवली. समाजव्यवस्थेत पिचलेल्या असंख्य आदिवासींच्या घरोघरी ज्ञानगंगा नेण्याचं व्रत स्वीकारलं. ग्राम बाल शिक्षा केंद्रानं सुरू केलेल्या पूर्वप्राथमिक शाळेत कार्यकर्ती म्हणून कामास प्रारंभ केला आणि ताराबाईंच्या निधनानंतर त्या संस्थेच्या संचालक झाल्या. ताराबाईंच्या रोपट्याचं त्यांनी पुढे वटवृक्षात रूपांतर केलं.

**किंवा**

३. **खालील उतारा शुद्धलेखनासह, योग्य विरामचिन्हे वापरून पुन्हा लिहा.**

खेडोपाडी गाव सुस्तावलेली असतात, शेतावर न गेलेल्या घरातल्या बायका सगळी घरकामं करून दोन घटका जरा डोळं मिटूया म्हणून विसावलेल्या असतात अन् घराच्या दरवाजावर टांगलेल्या पिंजऱ्यातला पोपटदेखील छानपैकी पेगत असतो. या सगळ्यांची काही क्षणांची विश्रांती असते दुपार परत ताजंतवानं होण्याकरीता कार्यरत असते ती
दुपार होते एखाद्या शहरात, नाही तर महानगरीत. काबाडकष्ट करून दमलेला कोणी गाडीवान आपलीच हातगाडी थोड्याशा सावलीत लावून आतापर्यंत बऱ्यापैकी कमाई मिळाली पण एखादी आणखी चांगली वर्दी येईल का  या विवंचनेत थोडा पहुडलेला असतो अन् कोणी शेठ तेवढ्यात त्याला 'ऊठ रे' करून उठवतोही थोडी लांबवरची वर्दी मिळालेली असते, त्यानेही फारशी घासाघीस न करता हमाली कबूल केलेली असते आणि तो कपाळावर उपरणं बांधून तातडीने गाडी ओढायला, दूपारचा आळस क्षणात बाजूला सारून तयार झालेला असतो. नागपुरच्या नाही तर अमरावतीच्या, नाही तर लखनौच्या वा कानपुरच्या तळपत्या उन्हात, जरा कुठं डुलकी काढू-विसावू म्हणणाऱ्या सायकलरिक्षावाल्यांना कोणी लांबची वर्दी दिलेली असते अन् घाम पुसत निघतात बिचारे रात्रीची पोटाची खळगी भरण्याकरिता भर दुपारी सायकल मारत. दुपार सलाम करते या गाडीवानांना अन् ही सायकल ओढणाऱ्या कष्टकऱ्याला

---